Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# लोकप्रबोधनाच्या व्याख्यानमालेतील 'ज्ञानगंगोत्री' वसंत व्याख्यानमाला

**सचिन शं. पालवे**
**सहायक प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,**

*sachinpalve.77@gmail.com*

## प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचे अवलोकन करीत असतांना विविध विचारवंतांनी आणि समाजसुधारकांनी लोकप्रबोधन व समाज जागृतीसाठी विविधांगी मार्गाचा अवलंब केल्याचे आपणास दिसून येईल. लोकांमध्ये वैचारिक परिपक्वता यावी त्यांचे ज्ञानवर्धन व्हावे यासाठी यासाठी न्या. रानडे यांनी मे १८७५ यावर्षी वसंत व्याख्यानमाला या उपक्रमाला सुरवात केली. या व्याख्यानमालेपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सार्वजनिक व्याख्यानमालांची सुरुवात करण्यात आली. समकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक पर्यावरणाशी संवादी राहून भविष्य काळाची दिशा निश्चित करता येते परिणामी लोकांची व राष्ट्राची उन्नती साधता येते. या दृष्टिकोनातून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यउत्तर काळात वसंत व्याख्यानमालेच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला असता व्याख्यानमालेतील व्यासपीठाने महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आपणाला दिसून येईल.

## वसंत व्याख्यानमालेची पार्श्वभूमी, प्रयोजन

न्या. रानडे यांनी १८७१ साली वक्तृत्वोत्तेजक सभेची स्थापना केली त्यामागे विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कलेचा विकास व्हावा हा हेतू होता. ज्ञानप्रसार आणि ,विचारजागृती मुक्तपणे मोठ्या प्रमाणावर झाल्याशिवाय टिकाऊ स्वरूपाची देशउन्नती होणे शक्य नाही ही गोष्ट न्या. रानडे यांनी अचूक ओळखली. इंग्रजी शिक्षणामुळे नवशिक्षित तरुणांचा वर्ग उदयाला येत होता, त्यांच्या ज्ञानाचा समाजाला उपयोग व्हावा व लोक अधिक चौकस ,विचारी, धीट व्हावे यासाठी वेगळ्या व्यासपीठाच्या निर्मितीची कल्पना न्या. रानडे यांनी केली व वसंत ऋतूत, सुट्टीच्या कालावधीत, मे १८७५ यावर्षी त्यास मूर्त रूप मिळाले.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील वसंत व्याख्यानमालेची वाटचाल

वसंत व्याख्यानमालेच्या प्रारंभी नवी शिक्षण पद्धती, नवविचार, नवीन कायदे , स्त्री मुक्तीची चळवळ या विषयांवर व्याखाने आयोजित केली जात. लोकमान्य टिळकांनी 'व्याख्याता आणि श्रोता यांचे नाते गुरु शिष्याप्रमाणे आहे' असे व्याखानाप्रसंगी, व्याख्यानाच्या स्वरूपावर भाष्य केले. मालेचे ज्ञानसत्र मुक्त असल्यामुळे वसंत व्याख्यानमालेत सर्व विचारधारेच्या, पंथाच्या, जाती जमातीच्या व्याख्यात्यांनी ज्ञानदानाचे कार्य केले. प्रारंभी मालेच्या ज्ञानसत्रात महिलांचा व्याख्याता - श्रोता म्हणून सहभाग अल्प होता. पहिल्या

महिला व्याख्याता म्हणून १८८९ साली पंडिता रमाबाई यांनी वसंत व्यानखानमालेच्या व्यासपीठावरून वाख्यान दिले. पंडिता रमाबाई यांनी 'स्त्रिया सुशिक्षित झाल्या तर मुलांची जोगवण फारच चांगल्या रितीने होईल' असे मत व्यक्त करून स्त्री शिक्षणाचे त्याचप्रमाणे आदर्श पिढी घडविण्यात स्त्रियांचे असलेल्या योगदानाचे महत्व त्यांनी विशद केले.

१८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली व भारतात सनदशीर राजकारणाचा पाया घातला गेला. आधी राजकीय कि सामाजिक सुधारणा यावरून विचारवंतांमध्ये होणारे मतभेद, सततचे दुष्काळ, प्लेग सारखा साथीचा आजार, रँड ची दडपशाही, वृत्तपत्रावरील खटले, या सर्व अडथळ्याच्या शर्यतीत वसंत व्याख्यानमाला मार्गक्रमण करीत होती. ब्रिटिशांची ही व्याख्यानातील विषयावर, व्याख्यात्यावर व श्रोत्यांवर वक्रदृष्टी होतीच. याच सुमारास लोकमान्य टिळकांकडे वसंत व्याख्यानमालेचे नेतृत्व आले. त्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी समाजजागृती करण्यासाठी आपली मते लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडून यावे यासाठी ४ जानेवारी १८८१ रोजी केसरी व मराठा ही दोन वर्तमानपत्रे सुरु केली होती.

ब्रिटिशांच्या अन्यायी कारभाराची चिकित्सा करणे व लोकांचे प्रबोधन करणे हे दुहेरी प्रयोजन वर्तमान पत्रांच्या माध्यमातून लोकमान्य टिळक साध्य करत होते. लोकमान्य टिळक कर्मयोगी होते, विचारांना त्यांच्या कृतीची जोड होती. स्वातंत्र्य मिळावे आणि ते शक्य तितक्या लवकर मिळावे हि त्यांची आग्रही मागणी होती, त्यासाठी त्यांनी स्वराज्याची चतुःसूत्री लोकांना दिली. स्वराज्याची चळवळ उभी करणे व ती जनमानसात रुजवण्यासाठी त्यास पूरक कार्यक्रम लोकांना देणे, स्वराज्य प्राप्तीसाठी वेगवेगळ्या व्यासपीठाचा उपयोग करून घेणे, अशी त्यांची कार्यशैली होती. वसंत व्याख्यानमाला अडचणीतून मार्गक्रमण करत असतांना केसरी- मराठा संस्थेने तिला भक्कम पाठिंबा दिला. राष्ट्रीय व सामाजिक प्रश्न व्यासपीठावरून चर्चिले जाऊ लागले. स्वराज्याच्या चतुःसूत्रीचा जागर व्याख्यानमालेच्या व्यासपीठावरून होऊ लागला. लोकमान्य टिळकांनी केसरी-मराठा वृत्तपत्र त्याचप्रमाणे वसंत व्याख्यानमाला च्या माध्यमातून 'विचार स्वातंत्र्य' चे मूल्य लोकांमध्ये रुजविले व मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे लोकांना स्वातंत्र्य विचार करण्यास भाग पाडले. विविध मार्गांनी लोकसंग्रह व लोकांमध्ये स्वाभिमान जागृत करून लोकमान्य टिळकांनी पुढील गांधीयुगाची पार्श्वभूमी तयार करून ठेवली.

## वसंत व्यख्यानमालेतील निवडक तत्वसूचक विधानं

माणूस हा भावनाशील, बुद्धिमान तसेच समाजशील प्राणी असल्याने आपल्या भावना व विचार यांचा आविष्कार व त्याचे संक्रमण व संज्ञापन हा मानवी प्रवृत्तीचा स्थायी भाव आहे. या प्रवृत्तीचे समाधान करण्यासाठी वसंत व्याख्यानमाला 'मुक्त अभिव्यक्तीचे मुक्त व्यासपीठ' आहे. हे आपल्याला खालील विधानांवरून दिसून येते.

'ज्ञानेश्वरांच्या काली महाराष्ट्र स्वराज्य व साम्राज्य यांच्या सुखसाधनांनी समृद्ध होता.' ल. रा. पांगारकर 1911

**'आपण भौतिक शास्त्रात मागे पडल्यामुळे आपल्याला अन्न मिळवण्याची टंचाई पडू लागली आहे.' वि.का. राजवाडे** 1914

**'मुद्रणकलेच्या शोधामुळे सर्वभक्षक काळावर माणसाने पूर्ण जय मिळवला आहे.' अ. ब. कोल्हटकर** 1916

**'जगातील सर्व धर्माचा उगम आशिया खंडातच असून आजपर्यंत सर्व धर्मप्रवर्तन काळ्या राष्ट्रातूनच झाले.' ' डॉ. ॲनी बेझंट** 1916

**'जगात अद्वैत आहे याचा अर्थ असा की जगातील मूलपरमाणु एकरूपच आहेत.' वा. म. जोशी** 1916

**'दुसऱ्यास स्वातंत्र्य देण्यास जो तयार नाही तो स्वत: स्वातंत्र्यास अपात्र असतो.' सरोजिनी नायडू** – 1921

**'इंग्रजांचा मुख्य व्यापार कापडाचा आहे तो धुवून काढल्याशिवाय त्यांचे राज्य येथून जाणार नाही.' राजगोपालचार्य १९२८**

**'खेड्यातील लोकांना साक्षर करणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे व ते जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत आपल्या राष्ट्राची उन्नती होणार नाही.' महर्षि धोंडो केशव कर्वे** – 1936

**'समाजवाद म्हणजे संपत्तीचे उत्पादन व विभाजन समाजाच्या मालकीचे ठेवणे.' मानवेंद्र रॉय १९३७**

**'जगातील परस्परविरूद्ध धर्माच्या पुढाऱ्यांनी एकत्र होऊन सर्वधर्माचे अध्यन करावे म्हणजे सर्वत्र दिसणारी भिन्नता नाहीशी होईल.' ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर**

**'साहित्यिकांनी समाजजीवणाचा खोल अभ्यास करूनच साहित्य निर्माण करावे' प्रा. श्री. म. माटे** 1946

**'सौंदर्य हाच ललितवाङ्‌मयाचा आत्मा आहे.' प्रा. ना. सी. फडके** 1946

**'सिलोनमधील हिंदी बांधवांना न्याय हक्क मिळवून देणे आपले कर्तव्य आहे.' लोकनायक मा. श्री. अणे 1945**

**वरील विधानांवरून विविध क्षेत्रातील विचारवंतांच्या विद्याव्यासंगाचा लाभ श्रोत्यांना झालेला दिसून येईल. साहित्य विश्वातील कलावादी व जीवनवादी ह्या दोन्ही परस्पर विरोधी भूमिका प्रा. ना. सी. फडके व प्रा. श्री. म. माटे यांनी वसंत व्याख्यानमालेच्या व्यासपीठावरून मांडलेली दिसून येते. साहित्य, राजकारण, शिक्षण, सामाजिक , वैज्ञानिक, सांस्कृतिक या विविध क्षेत्रातील घडामोडीची परामर्श वसंत व्याख्यानमालेत घेण्यात आला व राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्नावर व्याख्यानमाला अधिक समाजाभिमुख झाली. आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी, दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीय स्वराज्याच्या चळवळीने जोर धरला परिणामी भारतीय स्वातंत्र्याची पहाटेची चिन्ह दिसू लागली. याच काळात गांधीवाद, कम्युनिझम, समाजवाद, हिंदुत्ववाद, लोकशाही, समाजवादी अर्थरचना या लोकांच्या जीवनाशी निगडित आवश्यक नव्या प्रवृत्तीची**

**दखल वसंत व्याख्यानमालेच्या व्यासपीठावरून घेतली गेली व स्वातंत्र्योउत्तर भारताच्या वाटचालीविषयी विचारमंथन करण्यात आले .**

## सारांश

**व्यक्ती तत्कालीन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय,परिस्थीचे अपत्य असते. या सर्व क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडीचे तत्कालीन व दूरगामी परिणाम व्यक्तीवर परिणामतः समाजजीवनावर घडत असतात, याचे महत्व जाणून वसंत व्याख्यानमाला ह्या सर्व क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडीशी कायम संवादी राहिल्याचे दिसून येते. न्या. रानडे यांनी वसंत व्याख्यानमालेच्या माध्यमातून ज्ञानाने, विचाराने निद्रिस्त असलेल्या समाजाला जागे केले. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक व्याख्यानमाला ह्या लोकजागृतीचे व्यासपीठ आहे, राष्ट्रीय चेतना निर्माण करण्याचे ते साधन आहे त्यास समाजप्रबोधनाची दृष्टी आहे आणि व्याखाने लोकांमध्ये संकल्पशक्ती आणि कार्यशीलता प्रदान करतात हे दाखवून दिले. लोकमान्य टिळकांनी आपल्या लेखणीने , व्याख्यानाने लोकांना आत्मशोध घेण्याची प्रेरणा दिली त्यांतून लोकांमध्ये आत्मभान निर्माण झाले, गांधी युगामध्ये हि जाणीव उत्कटपणे दिसू लागली. व्याख्याते विविध विषयावर आपले विचार अधिक धाडसाने मांडू लागले. बदलत्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे प्रतिबिंब व्याख्यानमालेच्या ज्ञानसत्रात स्पष्ट दिसू लागले. वसंत व्याख्यानमालेच्या ज्ञानसत्रात विविधता आणण्याच्या दृष्टिकोनातून चर्चा-परिसंवादी कार्यक्रम आणि रंगभूमी, संगीत, चित्रपट, काव्यगायन, कथाकथन, व लोककलांचा हि व्यासपीठावरून परामर्श घेतला गेला. यामुळे वेगवेगळी अभिरुची असलेले व्याख्याते-श्रोते मालेच्या ज्ञानसत्राला लाभले व लोकांच्या ज्ञानाचा, विचारांचा परीघ विस्तारण्यात मदत झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातच न्या. रानडे आणि लोकमान्य टिळक यांनी लोकशाही भारतात विविध परस्पर विरोधी मतांचे, अभिप्रायाचे , प्रतिपादनाचे चक्र अव्याहत पणे चालविले पाहिजे हा वस्तुपाठ घालून दिला होता व वसंत व्याख्यानमालेच्या ज्ञानपीठाने आजपर्यंतच्या प्रवासात हि भूमिका समर्थपणे बजावलेली दिसून येते.**

## संदर्भ ग्रंथ

**1) स्मरणिका, वसंत व्याख्यानमाला शताब्दी महोत्सव - केसरी प्रकाशन १९७४**

**2) संपादक, डॉ. वसंत गोखले, महाराष्ट्रातील सार्वजनिक व्याख्यानमाला परिचय, , केसरी प्रकाशन, १९९०**

**3) दै. केसरीचे अंक**

**4)संपादक, डॉ. दीपक ज. टिळक, 'स्वराज्य' लोकमान्यांची गर्जना शताब्दी वर्ष अंक , केसरी प्रकाशन, पुणे , २०१६**

**4) संकलन डॉ माधव राजवाडे, लोकमान्य टिळक एक चिकित्सक अभ्यास, ग्रंथाली प्रकाशन, २०२२**